# प्रेस नोट्स तारिख-11/03/2025

**जोडभावीपेठ पोलीसांनी निघृणपणे खुन केलेल्या आरोपीस 08 तासाचे आत अटक करुन सदरचा गंभीर गुन्हा उघडकीस आणले बाबत.**

दिनांक-10/03/2025 रोजी रात्रौ-11.50 वा सुमारास जोशीगल्ली रविवारपेठ सोलापूर येथील उध्दव महाराज यांचे राहते घरासमोरील रोडवरती एक इसम जखमी होवुन रक्ताचे थारोळ्यात पडला आहे असे जोडभावीपेठ पोलीस ठाणे कडील डायल 112 ला कॉल लागल्याने जोडभावीपेठ पोलीस सदर ठिकाणी जावुन खात्री केले असता सदर जखमी इसमांचे नाव तुकाराम उर्फ रॉबट पांडुरंग सरवदे रा.रविवारपेठ जोशीगल्ली सोलापूर असे असल्याचे समजले.सदर इसमांस औषध उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल सोलापूर शहर येथे दाखल केले असता सदर इसम हा उपचारा पुर्वीच मयत झाले असल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी कळविले. सदर इसमाचा निघृण खुन झाला असल्याचे समजल्याने त्या अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो श्री.एम.राजकुमार,पोलीस उप आयुक्त सो (परिमंडळ) श्री.विजय कबाडे,सहाय्यक पोलीस आयुक्त सो विभाग-01 प्रताप पोमण, यांनी तत्काळ सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक कळविले.

त्या अनुषंगाने जोशीगल्ली रविवारपेठ सोलापूर येथे जावुन चौकशीकरुन मयत इसमाचा भाऊ विष्णु पांडुरंग सरवदे याचेकडे चौकशी केले असता सदर मयत इसम नामे तुकाराम उर्फ रॉबट पांडुरंग सरवदे याने सन-2019 मध्ये उत्तम प्रकाश सरवदे याचा भाऊ सागर प्रकाश सरवदे याचा खुन केला होता.त्याचा राग मनात धरुन बदला घेण्याचे उद्देशाने इसम नामे उत्तम प्रकाश सरवदे याने दिनांक-10/03/2025 रोजी रात्री-11.50 वा सुमारास जोशीगल्ली रविवारपेठ येथील उध्दव महाराज सरवदे यांचे घरासमोर मयत इसम नामे तुकाराम उर्फ रॉबट पांडुरंग सरवदे वय-30 वर्ष,यास हाताने व लाथा बुक्याने जबर मारहाण करुन गंभीर जखमी करुन जिवे ठार मारुन पळुन गेला असल्याने त्याचे विरुध्द जोडभावीपेठ पोलीस ठाणे गु.र.नं.164/2025 भारतिय न्याय संहिता कलम-103(1),प्रमाणे दिनांक-11/03/2025 रोजी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर गुन्ह्याचा तपासात जोडभावीपेठ पोलीसांना गुप्त बातमीदाराव्दारे सदर गुन्ह्यातील फरार आरोपीबाबत माहीती प्राप्त झाली होती.सदर माहीतीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी राहण्यास असलेल्या इसमाकडे चौकशी करुन तसेच गोपनिय बातमी मिळवुन तसेच तांत्रीक पध्दतीचा वापर करुन, अधिक चौकशी करुन सदर गुन्ह्यात आरोपी नामे उत्तम प्रकाश सरवदे वय-35 वर्ष, रा.रविवारपेठ जोशीगल्ली सोलापूर यास शिताफीने पकडुन ताब्यात घेवुन सदरचा गंभीर गुन्हा घडले पासुन 08 तासाचे आत उघड करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस आयुक्त सो श्री.एम.राजकुमार,पोलीस उप आयुक्त सो (परिमंडळ) श्री विजय कबाडे,सहाय्यक पोलीस आयुक्त सो विभाग-01 प्रताप पोमण,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुहास चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्रीमती शबनम शेख, पो.हे.कॉ.404/इम्रान बशीर शेख,पो.कॉ./1565 दादासाहेब सरवदे,पो.कॉ.613/स्वप्निल उत्तम कसगावडे, पो.कॉ.1917/यश नागटिळक,पो.कॉ.1624/मल्लिनाथ स्वामी,पो.कॉ.912/विजयकुमार महादेव कोष्टी यांनी पार पाडली आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.निरीक्षक शबनम शेख ने.जोडभावीपेठ पोलीस ठाणे सोलापूर शहर हे करीत आहेत.

(सुहास चव्हाण)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
जोडभावीपेठ पोलीस ठाणे
सोलापूर शहर